महाराष्ट्र शासन
## वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
प्रशासकीय इमारत, कृषि नगर, वसमत रोड, परभणी -४३१ ४०२(महाराष्ट्र राज्य)

| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
|---|---|---|---|
| वेबसाईट | : www.vnmkv.nic.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


जा.क्र.२०२४/३७वी वि.से.प्र.प/आस्था-३/4532 दिनांकः २६-०९-२०२४

संदर्भ - १. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक:विपधो-२६२०/प्र.क्र.१६/का.१७ दिनांक ३१ मार्च, २०२१
२. महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक कृषिआ-१६१३/प्र.क्र.१९१/१६-ए दिनांक २९, जानेवारी, २०१८
३. विद्यापीठ परीपत्रक, जा.क्र.२०२४/सं.क्र.४०६/आस्था-३ दिनांक ०४-०१-२०२४ व विद्यापीठ शुध्दीपत्रक दिनांक १०-०७-२०२४

# परिपत्रक

संदर्भीय शासन निर्णया नुसार विभागीय सेवाप्रवेशोत्तर परीक्षा गट-अ, गट-ब, व गट-क मधील अधिकारी/कर्मचारी यांना उत्तीर्ण होणे अथवा सुट मिळविणे अनिवार्य करण्यात आलेली आहे. तसेच शासकिय कर्मचाऱ्यांने नियुक्तींच्या दिनांकापासुन एकूण ०३ संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

सबब शासन निर्णयातील तरतुदीनुसार विद्यापीठातील गट-ड (वर्ग-४) मधील कर्मचाऱ्यांना विभागीय सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट असल्यामुळे त्यांना सदर परिक्षेस बसण्यास देण्यात आलेली परवानगी या परिपत्रकाव्दारे रद्द करण्यात येत असुन त्यांच्या यापुर्वी दिलेल्या परिक्षेच्या संधी गणल्या जाणार नाहीत.

विभागीय सेवाप्रवेशोत्तर परिक्षा एकूण ०३ संधीमध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तथापी यापुर्वी विद्यापीठातील गट-ड (वर्ग-४) मधील कर्मचाऱ्यांनी त्यांना सेवाप्रवेशोत्तर परीक्षा अनिवार्य नसताना परिक्षेस बसून काही पेपर/विषय उत्तीर्ण केलेले असून त्यासाठी त्यांनी ०३ पेक्षा जास्त संधी उपभोगलेल्या आहेत. सदरील कर्मचारी पदोन्नतीने गट-क मधील पदावर नियुक्त झाल्यानंतर पुर्वी गट-ड (वर्ग-४) मध्ये असतांना उत्तीर्ण केलेल्या पेपर/विषयामधुन सुट ची मागणी करत आहेत. करीता संबंधित कर्मचाऱ्यांना सदरील पेपर/विषयामध्ये सुट देता येणार नसल्याने त्यांनी नव्याने शासन नियमानुसार विहीत कालावधीत विभागीय सेवाप्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा सुट मिळविणे आवश्यक राहिल.

**मा. कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने,**

26/09/2024

**(संतोष वेणीकर)**
**कुलसचिव**

**प्रतिलिपीः** संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/ संचालक संशोधन/ संचालक विस्तार शिक्षण/ सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण)/ विद्यापीठ अभियंता/ नियंत्रक, वनामकृवि, परभणी *यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक आपल्या अधिनिस्त कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.*

**प्रत :**

१. मा. कुलगुरु यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.

२. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, परभणी *यांना देवून कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक* ***विद्यापीठ कर्मचारी सेवाप्रवेशोत्तर परीक्षा*** *या सदराखाली विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.*